नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ४१ | Issue - 41 | वार शुक्रवार दि. २७ जून २०२५ | Blow- Friday Date 27 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पहिली नव्हे, तिसरीपासून हिंदी भाषेची पुस्तके

## शिक्षणमंत्री दादा भुसेंनी सांगितला शिक्षण धोरणातला मुद्दा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा सुत्रीवरुन सुरू असलेल्या वादासंदर्भात शिक्षणमंत्री दादा भुसे (ऊवर लर्हीश) यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरेंची भेट घेऊन त्यांना सरकारची भूमिका समजावून सांगितली. मात्र, आपल्याला सरकारची भूमिका मान्य नाही, शाळेत (डलहेश्र) पहिलीपासून तिसरी भाषा देण्यास आमचा विरोध असल्याचे राज ठाकरेंनी स्पष्ट केले. त्यानंतर, आता दादा भुसेंनी पत्रकार परिषद घेत सरकारची बाजू पालक व जनतेपुढे मांडली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, अनेक बाबींचे अभ्यासपूर्ण धोरण ठेवण्यात आले आहे. एखादी तिसरी भाषा (चरीरींहळ) बंधनकारक म्हणून सरकारने निर्णय घेतलेला नाही, पालकांना जे योग्य वाटेल ते करायचे आहे. शैक्षणिक धोरणात काही बाबी या राज्य सरकारवर ठेवल्या आहेत, साधारण २ ते ८ वयात मुले भाषा लवकर शिकतात, हे वैज्ञानिकांच मत आहे.




राज ठाकरे यांची आम्ही भेट घेतली, १९६७ पासून प्रवास आणि निर्णय आम्ही त्यांना सांगितले, सर्व बाबी आम्ही त्यांच्या समोर ठेवल्या आहेत, वस्तुस्थिती त्यांच्या समोर ठेवली आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी बंधनकारक आहे, यापूर्वीच करण्यात आले आहे, मराठी आपली मातृभाषा, राज्यभाषा आहे. केंद्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे, प्रत्येक भाषेचे महत्व असते. आपण कोणाला कमी लेखत नाही, मराठी भाषेचे महत्त्व किंचितही कमी होऊ शकणार नाही, असे दादा भुसे यांनी म्हटलं.

पहिली आणि दुसरीमध्ये कोणतेही पुस्तक नसेल, त्यांना भाषेची परीक्षा द्यावी लागणार नाही, तिसरीपासून त्यांना औपचारिकपणे तिसरी भाषा शिकवली जाईल, असे मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

लहान वयात चित्र दाखवून मौखिक शिक्षण भाषेचे दिले जाते. इयत्ता १ आणि २ साठी मौखिक शिक्षण देतील. पुस्तके शिक्षकांसाठी असतील. राष्ट्रीय शिक्षण धोरणात लिहिल्याप्रमाणे ३ ऱ्या इयत्तेपासून मुलांचे तिसऱ्या भाषेबाबत लेखन शिक्षण होणार आहे. मध्यप्रदेश, सिक्कीम अशा राज्यात तिसरीपासून त्रिभाषा सूत्र आहे, आपल्याकडे देखील आनंददायी मौखिक शिक्षण दिले जाणार आहे, असे दादा भुसे यांनी सांगितले. मराठी भाषेच्या शाळेत पाचवीपासून हिंदी शिकवली जाते आहे, आता टप्प्याने पहिलीपासून इंग्रजी शिकवली जात आहे. जी पुस्तके आहेत ती आधीपासून बाजारात आलेली आहेत, नवीन निर्णयानुसार नवीन पुस्तके आली नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

भारतीय २० ते २२ भाषा आहेत, त्यापैकी विद्यार्थी हवी ती भाषा निवडू शकतील. पण, २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सांगितले तरच शिक्षक ती भाषा शिकवतील. अन्य मुलांना इ-प्रणालीचा वापर करून आम्ही शिक्षण देऊ. महाराष्ट्रात गेल्या ३०-४० वर्षांपासून वेगवेगळ्या भाषेच्या शाळा सुरू आहेत. राज्यात १,०८ ७५७ शाळांची संख्या आहे, २ कोटी ११ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. मराठी भाषेच्या शाळा ८५ हजारांपेक्षा जास्त तर १ कोटी ४७ पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. १५ हजारांपेक्षा जास्त इंग्रजी शाळा आहेत, अशी माहितीही दादा भुसेंनी दिली.

### २० ते २५ टक्के विद्यार्थ्यांना त्रिभाषा सुत्रानुसार आधीच शिक्षण

**दरम्यान, इतर माध्यमाच्या शाळेत आधीपासून तीन भाषा आहेत, मराठी सक्ती केल्यापासून, याचा अर्थ असा की, त्रिभाषा सूत्रापासून गेल्या काही वर्षात २० ते २५ टक्के विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. तिसऱ्या भाषेबाबत २० ते २२ भाषांपैकी पालक आणि मुले जी भाषा निवडणार त्यासाठी साप्ताहिक ५ तासिका निश्चित केल्या आहेत, अशी माहितीही भुसेंनी दिली.**

# दुष्काळी भागाचे चित्र बदलेल; शक्तिपीठ महामार्गाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून पाठराखण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : 'काही लोक प्रत्येक गोष्टीला विरोध करतात. आज समृद्धी महामार्गाने अनेक जिल्ह्यांचे चित्र बदलले आहे. विशेष करून मराठवाडा आणि दुष्काळी भागाचे चित्र बदलायचे असेल, तर शक्तिपीठ महामार्ग हे त्याचे उत्तर आहे,' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाची गुरुवारी पाठराखण केली.

शक्तिपीठ महामार्गासंदर्भात वित्त विभागाने काही शेरे मारले आहेत, असे बोलले जात असल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, 'पहिली गोष्ट म्हणजे वित्त विभागाने कधी घेतला जात नाही, असा कुठलाही आक्षेप घेतलेला नाही. अशा गोष्टी निदर्शनास आणून देणे हे वित्त विभागाचे कामच असते. तशा त्यांनी निदर्शनास आणून दिल्या. त्याला वित्त विभागाचा आक्षेप वगेरे म्हणता येत नाही. एक महामार्ग जेव्हा होतो, तेव्हा तो अर्थव्यवस्थेची दालने उघडतो. पायाभूत सुविधांमध्ये तुम्ही १२ हजार कोटींची गुंतवणूक करत असाल, तर तो परतावा १२ हजार कोटीपेक्षा कितीतरी जास्त असेल. म्हणूनच जगातील सगळे देश कर्जातून पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करतात. अर्थव्यवस्थेचा नियम आहे. पायाभूत सुविधांसाठी कज घेतले तर ते उत्तम कर्ज मानले जाते. अर्थव्यवस्थेचा विस्तार होतो. रोजगार निर्माण होतात,' असेही ते म्हणाले.

'शक्तिपीठ महामार्गाच्या प्रत्येक १०० किमीच्या टप्प्यात ५०० ते १००० शेततळी उभारली जाणार आहेत. शक्तिपीठ महामार्गावर जे नाले आडवे जात आहेत तिथे उड्डाणपूल वजा बंधारे बांधले जातील. पाणी अडवले जाणार असून दुष्काळी भागात जलसंवर्धनाकरिता याचा मोठा उपयोग होईल,' असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प साकारल्यास, आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या महाराष्ट्राला आणखी अडचणींना सामोरे जावे लागेल, असे राज्य सरकारच्या वित्त विभागाने म्हटले आहे. स्थानिक शेतकऱ्यांचा कमालीचा विरोध असताना या प्रकल्पाचा अट्टहास का,' असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला विचारला. 'आर्थिक स्थिती ठीक नसताना कर्ज काढून हा महामार्ग बांधण्याचा घाट का घातला जात आहे,' असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. 'शाळा, आरोग्य आणि जलजीवन मिशनसारख्या योजनांसाठीचा निधी वेळेवर दिला जात नसताना, इतर प्रकल्पांसाठी कर्ज काढून महाराष्ट्रावर आणखी कर्जाचा बोजा वाढवला जात आहे. निवडणुका येतील आणि जातील, परंतु एकदा महाराष्ट्राची आर्थिक घडी विस्कळीत झाली, असेही सुळे म्हणाल्या.

# इंजिनियरिंगसाठी २८ जूनपासून प्रवेश, डिप्लोमासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ; मंत्री चंद्रकांत पाटलांचा निर्णय

मुंबई : जून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी दहावी नंतरच्या महाविद्यालयीन (उेश्रश्रशसश) प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / वास्तुकला या पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दिनांक २० मे २०२५ पासून सुरु झालेली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची २६ जूनपर्यंत मुदत होती. प्रवेश प्रक्रियेसाठी मिळणारा उत्तम प्रतिसाद पाहता, अभियांत्रिकी पदविका प्रवेश अर्ज नोंदणीची पुन्हा मुदतवाढ ३० जुन २०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील (उहरपवीरज्ञरपीं रिंळश्र) यांनी दिली. मंत्री पाटील म्हणाले की, पुढील संपूर्ण प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तंत्र शिक्षण संचालनालयाद्वारे जाहीर करण्यात आले आहे. २६ जून २०२५ रोजी संध्याकाळ पर्यंत तब्बल १लाख ५० हजार ६८४ विद्यार्थ्यांनी पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज नोंदणी केलेली आहे, तर त्यापैकी १ लाख ३० हजार ८८५ विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा केले आहेत.



या वर्षी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत (कॅप) प्रवेशाच्या चार फेऱ्या घेण्यात येणार आहेत. पहिल्या फेरीसाठी पहिला विकल्प, दुसऱ्या फेरीसाठी पहिले तीन विकल्प, तिसऱ्या फेरीसाठी पहिले सहा विकल्प तर चौथ्या फेरीसाठी सर्व विकल्प अनिवार्य असणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कॅप फेरीसाठी विकल्प अर्ज भरुन केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घ्यावा, असे आवाहनही मंत्री श्री. पाटील यांनी विद्यार्थ्यांना केले.

दहावीचा निकाल जाहीर होताच तंत्रशिक्षण संचालनालयाने पॉलिटेक्निक प्रवेशाचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले. दहावीनंतर कमी कालावधीत तंत्रशिक्षण घेऊन अभियंता होण्यासाठी तंत्रशिक्षणातील पदविका अभ्यासक्रम हा एक उत्तम पर्याय आहे. हा पदविका अभ्यासक्रम १० वी नंतर तीन वर्षांचा असतो व हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पात्रतेच्या निकषानुसार विविध शिष्यवृत्ती शासनातर्फे देण्यात येते. पदविका शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षात पात्रतेनुसार प्रवेश घेण्याची संधीही उपलब्ध असते.

मराठी-इंग्रजी (द्विभाषिक) माध्यमातून अध्यापनाचा पर्याय निवडक पॉलिटेक्निकमध्ये उपलब्ध आहे. सभोवतालच्या औद्योगिक क्षेत्रांमधील आवश्यक गरजा ओळखून पॉलिटेक्निकमध्ये न्यू इमर्जिंग टेक्नॉलॉजी संबंधित सध्या मागणी असलेले नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम जसे की आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डाटा सायन्स, रोबोटिक्स इ. असे अभ्यासक्रम सुरु केले गेले आहेत.

# विदर्भाला पावसाने झोडपले! बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्ह्यांत पूरस्थिती, अनेक मार्ग झाले ठप्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर: विदर्भात बुधवारी सायंकाळपासून सुरू झालेली कोसळधार गुरुवारी रात्री उशिरापर्यंत कायम राहिल्याने बुलढाणा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात नदी, नाल्यांना पूर आला. मेहकर व लोणार तालुक्यात हाहाकार उडाला.


कांचनगंगा नदीला पूर आल्याने मुंबई-नागपूर महामार्ग बंद पडला. वाशीम जिल्ह्यात कुकसा फाट्याजवळील नदीला पूर आल्याने जुना संभाजीनगर-नागपूर, किनिराजा-वाशीम आणि मेडशी-भैरद मार्गावरील वाहतूक थांबली होती. यवतमाळातील घाटंजी-येरंडगाव आणि वर्धा-राळेगाव मार्गही पुरामुळे बंद करण्यात आला होता. वाघाडी नदीला पूर आल्याने घाटंजीतील अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने संसार उघड्यावर आले. शेतकऱ्यांवरील दुबार पेरणीचे संकट मात्र टळले आहे.

बुलढाण्यासह मेहकर, चिखली तालुक्यांतील २३ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. मेहकर तालुक्यातील डोणगाव भागात सलग १९ तासांपासून पाऊस पडत होता. डोणगावमधील अंधारवाडी भागात पाचशेवर नागरिकांना हलविण्यात आले. अनेक गावांमध्ये पुराचे पाणी शिरून घरांतील साहित्याचे नुकसान झाले.

मेहकरजवळ समृद्धी महामार्गावरील इंटरचेंजवरूनदेखील नदीच्या पात्रासारखे पाणी वाहू लागले. महामार्गाच्या पुलाखालूनही पाणी वाहू लागल्याने मेहकर-खामगाव महामार्ग ठप्प झाला होता.

डोणगाव येथील काही शेतकरी पुरात अडकले. झाडावर चढून त्यांनी आपला जीव वाचविला. एनडीआरएफच्या पथकाने या सर्वांना सुखरूप बाहेर काढले.

मुंबई-नागपूर महामार्गावरील वाहतूक कांचनगंगा नदीच्या पुराने ठप्प. नदीपासून पाचशे मीटर अंतरापर्यंत पुराचे पाणी. पूर ओसरण्याची वाट पाहणारे कारमधील लोक वाहनातच बसून होते. मात्र, रस्त्यावर पाणी वाढल्याने कार तेथेच सोडून लोक जीव वाचवून पळाले. वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यातील डिगडोह येथे यशोदा नदीला पूर. वर्धा-राळेगाव मार्ग बंद. आलमडोह गावात पुराचे पाणी शिरले.



यवतमाळातील घाटंजी तालुक्यात २४ तासात १२९ मिमी पाऊस. नदी, नाल्यांना पूर आल्याने वाहतूक ठप्प. घाटंजी-येरंडगाव मार्ग बंद. वाघाडी नदीला पूर आल्याने अनेक घरांत पाणी शिरले.

झरी-जामणी तालुक्यातील गणेशपूर शिवारातील कारखान्याचे शेड कोसळल्याने महिला कामगाराचा दबून मृत्यू; तर सात जखमी झाले.

**वीज पडून दोन भावंडांचा मृत्यू**

शेतात पेरणी करीत असताना पावसाला सुरुवात झाल्याने बचावासाठी झाडाखाली थांबले; पण याच झाडावर वीज कोसळल्याने दोन भावंडांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास कारंजा घाडगे शेतशिवारात घडली. रितेश मोरेश्वर सरोदे (२२) व राजेश ताराचंद सरोदे (१६) रा. खर्डीपुरा अशी मृतांची नावे आहेत. हे दोघेही चुलत भाऊ होते. मोरेश्वर सरोदे यांच्या शेतावर कापसाची पेरणी सुरू असल्याने हे दोघेही गेले होते.

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

## आषाढी यात्रेची लगबग, पंढरीत भाविकांची गर्दी

# आषाढी यात्रेसाठी १३ लक्ष ५० हजार बुंदी लाडू प्रसादाची निर्मिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढ शुध्द एकादशीला म्हणजे दिनांक ०६ जुलै रोजी आषाढी यात्रा संपन्न होत आहे. या यात्रेचा कालावधी सुरू झाला असून, भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. या भाविकांना श्रींचा प्रसाद म्हणून मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणारा प्रत्येक भाविक दर्शन झाल्यानंतर श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद खरेदी करत असतो. मंदिर समितीच्या बुंदी लाडू प्रसादाला भाविकांतून मोठी मागणी होत असते. या प्रत्येक भाविकांना लाडू प्रसाद मिळेल या दृष्टीने १३ लक्ष ५० हजार बुंदी लाडू प्रसाद व ६० हजार राजगिरा लाडू प्रसादाची उपलब्धी ठेवण्यात येत आहे. यामध्ये बुंदी लाडू प्रसाद मंदिर समितीमार्फत व राजगिरा लाडू प्रसाद आऊटसोर्सिंग पद्धतीने खरेदी करण्यात येत आहे.

७० ग्रॅम वजनाचे दोन बुंदी लाडू कागदी पिशवीत पॅकिंग करून प्रति पाकीट २० रुपये प्रमाणे व २५ ग्रॅम वजनाचे दोन राजगिरा लाडू पॅकिंग करून प्रति पाकीट १० रुपये प्रमाणे भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

यासाठी पश्चिम द्वार, उत्तर द्वार, श्री संत तुकाराम भवन असे एकूण तीन स्टॉल असून, सर्व स्टॉल २४ तास खुले ठेवण्यात येत आहेत.

बुंदी लाडू प्रसाद एमटीडीसी भक्तनिवास येथील लाडू उत्पादन केंद्रामध्ये हरभरा डाळ, साखर, शेंगदाणा डबल रिफाइंड तेल, काजू, बेदाणा, विलायची इत्यादी पदार्था पासून तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियमांचे पालन करून तयार करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

बुंदी लाडूप्रसादासाठी आवश्यक कच्चा माल म्हणजे सुमारे २५००० किलो हरभरा दाळ, ३७५०० किलो साखर, १७००० किलो शेंगदाणा तेल, ५०० किलो काजू, ३७५ किलो बेदाणा, ३७ किलो विलायची, २५०० ग्रॅम केशरी रंगाची खरेदी करण्यात आली आहे. या लाडू प्रसादाची शासकीय प्रयोगशाळेतून खाण्यास योग्य असल्याबाबत तपासणी करून घेण्यात आली आहे.

बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद व्यवस्थेची जबाबदारी अनुभवी विभाग प्रमुख भिमाशंकर सारवाडकर यांना देण्यात आली आहे, याशिवाय सुमारे १२० कर्मचारी २४ तास परिश्रम घेत आहेत. भाविकांना दिला जाणारा लाडू प्रसाद स्वादिष्ट करतांना आरोग्याच्या दृष्टीनेही सर्व नियम पाळण्यात येत आहेत.

प्रसाद पॅकिंग करण्यासाठी पर्यावरण पूरक कागदी पिशवीचा वापर करण्यात येत असल्याचे मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.



## संपादकीय....

### पुरेसा इंधन साठा

इस्रायल-इराणचा संघर्ष १२ दिवस चालला. अशीच परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ शकते. तसं घडल्यास इंधन कमतरतेचं संकट आ वासून उभं राहू शकतं. अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी सरकारनं आपत्कालीन परिस्थितीत वापरायचा तेल साठा ९० दिवस पुरेल इतका करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा अर्थ आपत्कालीन स्थितीत परदेशातून खनिज तेल न आल्यासही भारत ३ महिने तग धरुन राहू शकतो. सध्याच्या घडीला देशात आपत्कालीन परिस्थितीत वापरासाठी इंधनाचा साठा उपलब्ध आहे. पण साठा देशाला केवळ ९ दिवस पुरेल इतकाच आहे. इराण-इस्रायल यांच्यातील संघर्ष १२ दिवसांनी थांबला. त्यामुळे पश्चिम आशियातील तणाव काही प्रमाणात कमी झाला. पण यामधून भारतानं महत्त्वाचा धडा घेतला आहे. देशाची ऊर्जा सुरक्षा ओळखून त्यासंदर्भात सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकार आणखी ६ ठिकाणी इंधनाचे राखीव साठे तयार करणार आहे. यासाठी येणारा खर्च मोठा आहे. पण पश्चिम आशियातील वाढता तणाव लक्षात घेता हा निर्णय देशाच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. सरकारनं रणनीतीवर काम करण्यासाठी, ती अंमलात आणण्यासाठी सरकारी अभियांत्रिकी सल्लागार कंपनी इंजीनियर्स इंडिया लिमिटेडला अहवाल तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पश्चिम आशियात नुकताच झालेला संघर्ष पाहिल्यानंतर त्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारनं हा निर्णय घेतलेला आहे. देशातील ६ ठिकाणी खनिज तेलाचा साठा करण्यात येणार आहे. खनिज तेलाचा एक राखीव साठा कर्नाटकच्या मंगळ-रुस्थित विशेष आर्थिक झोनमध्ये तयार केला जाईल. तर दुसरा साठा राजस्थानच्या बिकानेर जिल्ह्यात करण्यात येईल. अन्य ४ साठे सागर किनाऱ्यांच्या जवळ किंवा तेल शुद्धीकरण केंद्रांच्या जवळ उभारले जातील. त्यामुळे वाहतूक सोपी होईल. इस्रायल सोबत संघर्ष सुरु असताना इराणच्या संसदेनं होर्मुज सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला. होर्मुज सामुद्रधुनी व्यापाऱ्याच्या दृष्टीनं महत्त्वाची आहे. एका ठिकाणी या सामुद्रधुनीची रुंदी केवळ ३२ किलोमीटर आहे. त्यामुळे या सामुद्रधुनीतून होणारी तेलाच्या टँकर्सची वाहतूक रोखली जाऊ शकते. जगातील एकूण तेल वाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक होर्मुजमधून चालते. तर भारत आयात करत असलेल्या एकूण खनिज तेलापैकी ४० ते ४५ टक्के तेल होर्मुजमार्गे येतं.

# एक प्रामाणिक व कर्तव्यदक्ष सेवक दत्तात्रय मारुती लोंढे यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बहुजन हिताय - बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन कर्मवीरांच्या त्याग व समर्पणातून उभी राहिलेली संस्था तसेच कार्यकारी मंडळाचे सन्माननीय पदाधिकारी आणि सन्माननीय संचालकांच्या अविरत प्रयत्नातून नावलौकिकास पात्र ठरलेल्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सिन्नर तालुक्यातील मनेगाव येथील नूतन जवाहर विद्यालयातील वरिष्ठ लिपिक दत्तात्रय मारुती लोंढे हे मविप्र समाज संस्थेतील जवळपास ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

रविवार दि.२९ जून २०२५ रोजी त्यांचा सेवापूर्ती सोहळा कार्यक्रम मातोश्री नर्मदा लॉन्स सिन्नर या ठिकाणी आयोजित केला आहे त्यानिमित्ताने........

सिन्नर येथील सर्वसामान्य विडी कामगार कुटूंबात दत्तात्रय मारुती लोंढे यांचा जन्म ५ जून १९६७ रोजी झाला. त्यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले होते. आई जानकाबाई यांनी सांभाळ करून वाढविले.

त्यांनी आपले चौथी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिन्नर येथे तर माध्यमिक शिक्षण पूर्वीचे जनता विद्यालय,सिन्नर येथे पूर्ण केले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण सिन्नर येथे झाले. आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे विड्या बांधण्याचे काम करून त्यातून येणाऱ्या पैशातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले . महाविद्यालयात शिकत असताना अनेक वेळा फी भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते .अशावेळी विद्यालयातील तत्कालीन संवेदनशील प्राचार्य आर.डी .पवार व त्यांचे सहकारी यांनी त्यांची फी स्वतः भरून त्यांना शिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यांनी बी.एस्सी.पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी अप्लाइड कॉम्प्युटर सायन्स कोर्स केला.

व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असते की चांगल्या ठिकाणी नोकरी मिळावी. त्यांना देखील महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेली संस्था मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेत नोकरीची संधी मिळाली.या मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले. अप्लाइड कॉम्प्युटर सायन्स कोर्स करून तासिका तत्वावर अल्प मानधनात नोकरीची सुरुवात त्यांनी सिन्नर महाविद्यालयातून सन १९९२ पासून केली. पूर्वीच्या काळी संगणक शिक्षणाला अतिशय महत्त्व होते. सिन्नर येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात संगणक शिक्षणाची मुहुर्तमेढ त्यांच्याच काळात झाली. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षक म्हणून त्यांनी अध्यापन केले आहे. त्यांच्याच काळात विद्यालयात संगणक लॅब सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षणाची गोडी त्यांनी लावली होती. फिक्स पे वर संगणक शिक्षक म्हणून त्यांनी काम केले आहे. संस्था हेच आपले दैवत मानून त्यांनी सेवा केली . कधीही स्वतःचा विचार केला नाही . त्यांना शिक्षणाची अत्यंत आवड व इच्छा होती. म्हणून नोकरी करून बीएड तसेच बीपीएड या पदव्या त्यांनी संपादन केल्या.

शिक्षक म्हणून काम करत असतानाच संस्थेने त्यांची सन २००१ मध्ये जनता विद्यालय, तिसगांव ता-दिंडोरी या विनाअनुदानित विद्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून नेमणूक केली. या विद्यालयात काम करीत असताना संस्थेने त्यांना मध्यवर्ती कार्यालय कामकाजात बोलविले . मध्यवर्ती कार्यालयात दोन ते तीन वर्षे काम केल्यानंतर त्यांची बदली न्यू इंग्लिश स्कुल नांदगाव या शाळेत झाली. परंतु या गोष्टीचा आपल्या कामकाजावर कोणताही परिणाम होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली. न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव या शाळेत त्यांनी पाच वर्ष कामकाज केले त्यांचा स्वभाव अत्यंत मितभाषी, शांत, परिश्रमी, कर्मनिष्ठ , मनमिळावू, एकनिष्ठ , परोपकारी व्यक्तिमत्व असलेला आहे. त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पूर्ण करण्यात नेहमीच अग्रेसर असायचे.

त्यानंतर त्यांची बदली जाखोरी या विद्यालयात झाली. या विद्यालयात कामकाज करीत असतानाच फक्त आठच महिन्यात त्यांची बदली पुन्हा एकदा सिन्नर तालुक्यातील जनता विद्यालय सोनांबे या विद्यालयात झाली. परंतु या बदली आदेशाबरोबरच त्यांना संस्थेच्या मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयात कामकाज करण्यासाठीचा आदेश देण्यात आला . मविप्र संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात कामकाज करण्यास अनेक सेवक इच्छुक असतात. परंतु लोंढे यांनी कोणताही प्रयत्न केला नाही .परंतु त्यांच्या चांगल्या कामकाजाचा विचार करून संस्थेने दुसऱ्यांदा त्यांना मध्यवर्ती कार्यालयात काम करण्याची संधी दिली. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तत्कालीन सरचिटणीस डॉ.वसंतराव पवार साहेब, श्रीमती नीलिमाताई पवार तसेच सध्याचे विद्यमान सरचिटणीस ड.नितीनभाऊ ठाकरे साहेब तसेच संस्थेचे विद्यमान संचालक कृष्णाजी भगत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज अखेर म्हणजे सेवानिवृत्तीपर्यंत जवळपास त्यांनी अठरा वर्ष मध्यवर्ती कार्यालयात कामकाज केले. कामकाज करीत असताना त्यांना संस्थेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री. आर.व्ही. तासकर, डॉ. एस. के. शिंदे सर तसेच विद्यमान शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके सर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले .संस्थेच्या शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा वापर करून त्यांनी कामकाज केले. एकनिष्ठता व प्रमाणिकपणाचे फळ त्यांना मिळाले. निःपक्षपातीपणे कामामुळे त्यांना मध्यवर्ती कार्यालयात सेवा करण्याची संधी मिळाली. संस्थेतील सेवकांची अनेक कामे जिल्हा परिषदेतून करून आणण्यात त्यांचा हातखंडा आहे.

त्यांना शिक्षक म्हणून काम करण्याची खूप इच्छा होती .परंतु त्यांचे स्वप्न अधुरे राहिल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे . त्यांनी हार मानली नाही .परंतु आहे त्यात समाधान मानून त्यांनी आपले कामकाज केले आहे.

असं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या श्री.लोंढे यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वावरतांना मोठ्या प्रमाणात मित्रपरिवार गोळा केला आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे त्यांच्या अर्धांगिनी अर्थात पत्नीचे योगदान असते.भाऊसाहेबांच्या सहचारिणी सौ. विजया याही त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना हा शैक्षणिक प्रवास करणे शक्य व सुलभ झाले.त्यांना वैभव हा एकलूता एक मुलगा असून त्याने इंग्रजी विषय घेऊन एम.ए.केले आहे. तसेच तो नेट,सेट परीक्षा पात्र असून सध्या बी.एड करीत आहे.

त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान अतिशय महत्वाचे आहे. सतत आनंदी व मितभाषी असलेल्या श्री.लोंढे यांना सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य अगदी सुखासमाधानाचे ,आरोग्यदायी भरभराटीचे जाओ. दीर्घायुष्य लाभो .हीच ईश्वरचरणी मनोकामना ! तुमची सेवा आणि समर्पण सदैव स्मरणात राहील .तुम्हाला सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा! तुमच्या पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा!

**शब्दांकन–श्री.सोमनाथ गिरी (सर)**
**जनता विद्यालय, डुबेरे**
**ता–सिन्नर जि– नाशिक**

# एमआयडीसीच्या मोकळ्या भूखंडावर विविध प्रकारची झाडे लावून सामाजिक कार्यकर्ते बाबूशेठ कांबळे यांनी केले वृक्षारोपण




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई/प्रतिनिधी : सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असे काम करणारे नवी मुंबईतील व्यवसायिक व सामाजिक कार्यकर्ते बाबुशेठ अर्जुन कांबळे यांनी महापे येथील मोकळ्या भूखंडावर विविध प्रकारची ५० झाडे लावून वृक्षारोपण केले आहे. या वृक्षारोपणामुळे कोणताच भूमाफिया या मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण करणार नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**एमआयडीसीच्या (Coridor) ग्रीन झोन म्हणुन राखीव असलेल्या भूखंडावर अतिशय उत्कृष्ट प्रकारची विविध प्रकारची झाडे लावून नागरिकांमध्ये वृक्षरोपण चे महत्व पटवून देण्याचे काम बाबू अर्जुन कांबळे उर्फ (बाबू शेठ ) यांनी केले आहे या पन्नास झाडांचे संगोपन देखील ते करणार आहेत.**

**– दिलीप काकनाटे**

पावसाळ्याची सुरुवात झाली असता साधारण जून जुलैमध्ये वृक्षरोपण मोहीम मोठ्या प्रमाणात चालू झालेली असते अशातच नवी मुंबई महापे येथील अडवली भूतवली गावा जवळील इलेक्ट्रॉनिक सदनामधील फ्लायस्काय हॉटेल शेजारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान या उद्यानाच्या जागेवर बहुजन आंबेडकर चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते बाबू कांबळे यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्याने वृक्षप्रेमी नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

दरम्यान:

यावेळी आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते बुद्धप्रकाश दिल्पाक,हॉटेल व्यवसायिक सुरेश शेट्टी यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष श्री अविनाश मडीखांबे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान या फलकाचे अनावरन करून वृक्षारोपण करण्यात आली.

# श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या चरणी चार किलोची चांदी घागर अर्पण



पंढरपूर : वै.ह.भ.प. जयदेव हरी भोईर यांच्या स्मरणार्थ भोईर बंधू यांनी आज दि.२६ जून रोजी ४ किलो १५० ग्रॅम वजनाची चांदीची घागर श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या चरणी अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन येथोचित सन्मान केला. त्यावेळी विभाग प्रमुख संजय कोकीळ उपस्थित होते. या चांदीच्या घागरीचे सुमारे ४ किलो १५० ग्रॅम वजन असून, त्याची अंदाजीत रक्कम ४ लाख ३३ हजार होत आहे. देणगीदार हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत.

सद्यस्थितीत, आषाढी यात्रा २०२५ चा कालावधी सुरू असल्याने भाविकांची मंदिर परिसरात व दर्शन रांगेत गर्दी होत आहे. देणगीदार भाविकांना देणगी देण्यासाठी ज्यादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. याशिवाय, सोने चांदीच्या स्वरूपातील वस्तू भेट स्वीकारण्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला असून, त्यासाठी विभाग प्रमुख, लिपिक व अनुभवी सराफाची नियुक्ती करण्यात आली आहे. इच्छुक भाविकांनी देणगी व सोने-चांदी भेटवस्तू देण्यासाठी मंदिर समितीच्या कार्यालयात संपर्क करावा असे मंदिर समितीच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

## दि. २८ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत राहणार बंदी

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी असून , यात्रा कालावधी २६ जून ते १० जुलै २०२५ असा आहे. या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या कालावधीत पंढरपूर शहरात कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी दि. २८ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीमध्ये मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्रीवर उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी बंदी आदेश जारी केले आहेत.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी श्री इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

# ज्ञानगंगा घरोघरी, गुरव ज्ञानगंगा प्रतिष्ठानचा उपक्रम : मुक्ताताई पुजारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माळशिरस : गुरव समाजात विविध संस्था व मंडळ कार्य करत आहे. प्रत्येक संस्था व मंडळाचे ध्येय धोरण व कार्य वेगळे आहे. प्रत्येक संस्था आपल्या परीने योगदान देण्याचे प्रयत्न करत असते. प्रत्येक संस्था आपल्या स्थानिक स्तरावर आपापल्या पद्धतीने समाज सेवा करत असते,प्रत्येक गुरव बांधवांच्या संस्था यशस्वी झालेले आहेत व सर्व संस्था कौतुकास्पद आहे.

गुरव ज्ञानगंगा प्रतिष्ठान एक अशी संस्था जी विद्यार्थ्यांसाठी आपले सर्वस्व अर्पण करण्यासाठी तयार झालेली आहे. कोणत्याही समाजात अशा प्रकारचा उपक्रम नसेल अशा प्रकारचा उपक्रम घेऊन ही संस्था कार्य करत आहे. या संस्थेचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे कारण ज्या पद्धतीने या संस्थेचे नियोजन व कार्य आहे, फक्त सेवा हेच या संस्थेचे ध्येय धोरण आहे.

समाज हितासाठी या संस्थेने एक वेगळे रूप निर्माण केलेले आहे.समाजाच्या मनावर ही संस्था सध्या राज्य करत आहे.समाज मनाला ही संस्था भावत आहे.

या संस्थेद्वारा विविध प्रकारच्या स्पर्धा सुद्धा राबवल्या जातात व या स्पर्धा सर्व ऑनलाईन असतात. विद्यार्थी अतिउत्साहन या स्पर्धेमध्ये भाग घेतात व पारितोषिक मिळवतात.विद्यार्थी हे पारितोषिक ऑनलाईन फोन पे द्वारे रोख स्वरूपात मिळवतात. आतापर्यंत या संस्थेद्वारा भरपूर स्पर्धा लावल्या गेलेल्या आहेत.

शिक्षण पाहिले तर शिक्षण हे जीवनाचे सर्वात महत्त्वाचे माध्यम आहे. जो विद्यार्थी शिक्षण करून पुढे जाईल तोच यशस्वी होईल अशी धारणा आहे. जर विद्यार्थी यशस्वी झाला तर समाज यशस्वी होईल अशी गुरव ज्ञानगंगा प्रतिष्ठानचे लक्ष आहे.समाजाला यशस्वी करायचे असेल तर समाजाचा विद्यार्थ्याला यशस्वी करा.गुरव ज्ञानगंगा प्रतिष्ठान आतापर्यंत या कार्यामध्ये पूर्णपणे यशस्वी झालेली आहे.

इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतचे विद्यार्थी या संस्थेची जोडलेले आहे. त्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाच्या नोट्स पुरवल्या जातात. त्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देण्याचे उपक्रम सध्या सुरू आहे व त्यावर तयारी सुद्धा चालू आहे. गुरव समाजातील जे विद्यार्थी खेडेगावात राहतात त्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित नको होता यावे यासाठी ही संस्था कार्य करत आहे.

आता यापेक्षा पुढे जात ही संस्था आता खूप मोठ्या प्रगतीपथावर जात आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देणे व शिक्षणासह त्या विषयांच्या नोट सुद्धा पुरवणी असे या संस्थेचे पुढचे ध्येय आहे.हे ध्येय सिद्ध करण्यासाठी ही संस्था दिवस-रात्र कार्य करत आहे परिश्रम करत आहे. एकंदरीत पाहिले तर या संस्थेची कितीही गुणगान केले तरी कमी आहे.

या संस्थेचे अध्यक्ष मुंबई येथील सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री पद्माकर पंढरीनाथ देवरे, ज्यांनी संस्थेची मुख्य कमान आपल्या हातात घेतलेली आहे व संस्थेला पुढे नेण्यासाठी व संस्थेचे काम यशस्वी करण्यासाठी ते सदा प्रयत्नशील आहे. संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त सुद्धा आपापल्या परीने या संस्थेसाठी कार्य करत आहे. उपाध्यक्ष शशिकांत सूर्यवंशी, कोषाध्यक्ष मनोज सूर्यवंशी, सचिव संजय गुरव, भूषण गुरव, सुनील गुरव, रविंद्र गुरव, सतीश कुवर, संतोष गुरव, सुनील शिंदे, भावेश गुरव अशा शिक्षण, व्यवसाय,शासकीय खाते,पत्रकारिता मध्ये काम करणाऱ्या सर्व युवकांनी मिळून या संस्थेची निर्मिती करण्यात आलेली आहे.या संस्थेचे ध्येय व धोरण विशेष असल्याने संपूर्ण समाजात या संस्थेचे विशेष कौतुक केले जात आहे. मोबाईलचा सदुपयोग कसा करावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे गुरव ज्ञानगंगा प्रतिष्ठान

शिक्षण क्षेत्राची सर्व जबाबदारी या संस्थेचे सचिव संजय गुरव हे पार पाडत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यामध्ये वेळापूर गावात प्रतापरावजी गुरव यांच्यातर्फे अखिल गुरव मध्यवर्ती संस्थामार्फत संजय गुरव सर यांना समाज भूषण पुरस्कार सुद्धा देण्यात आलेला आहे.

या संस्थेचे रजिस्ट्रेशन झाले असून लवकरच ही संस्था आता आपले पुढील ध्येय व उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कार्य करायला सुरुवात करणारा आहे. गुरव समाजातील जे शिक्षक या संस्थेला सहकार्य करण्यासाठी पुढे येतील त्यांचे स्वागत केले जाणार असल्याचे मुक्ताताई ज्ञानदेव पुजारी यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धाराशिवमध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

## डॉ. मैनाक घोष व भैरवनाथ कानडे यांचे प्रेरणादायी मनोगत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के. गायकवाड) – महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महार–ाज यांची जयंती दि २६ रोजी सामाजिक न्याय दिन म्हणून सामाजिक न्याय भवन, धाराशिव येथे विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रकाश अहिरराव, अध्यक्ष जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी भूषवले.

कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील, सहाय्यक आयुक्त श्री. सचिन कवले, जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर, प्रमुख वक्ते भैरवनाथ कानडे , दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी सचिन बांगर, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक पी. एम. झोंबाडे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक लक्ष्मण क्षीरसागर यांची उपस्थिती होती.

डॉ .मैनाक घोष यांनी सामाजिक न्याय संकल्पनेचा आधुनिक काळातील व संविधानातील अर्थ उलगडत लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी शाहू महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते तथा जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य भैरवनाथ कानडे यांनी राजर्षी शाहूंचे शैक्षणिक विचार या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले . शाहू महाराजांचा समतेवर आधारित शिक्षणविषयक दृष्टिकोन ,मागासवर्ग ,महिला व अल्पसंख्यांकाच्या शिक्षणासाठी केलेल्या क्रांतिकारी कार्यावर प्रकाश टाकुन राजर्षी शाहू महाराज हे उपक्रमशील व उत्कर्षशील राजे असल्याचे सांगितले .

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रकाश अहिरराव यांनी अध्यक्षीय मनोगतातून शाहू महाराजांचे सामाजिक धोरण, त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगद–ानाचे महत्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले . यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजर्षी शाहू महाराज डॉ . बाबासाहेब आंबेडकर , म . फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त पांडुरंग घोडके , भगवान वाघमारे ,शाहू , फुले , आंबेडकर राज्य पुरस्कार प्राप्त भटके व विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष जनक पाटील यांना डॉ . मैनाक घोष यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याशिवाय डॉ . बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अंतर्गत घेण्यात आलेल्या वक्तृत्व व अन्य विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण , राजर्षी शाहु गुणवत्ता पुरस्कार आणि जात पडताळणी प्रमाणपत्राचे वितरण उप–स्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय धाराशिव व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले. उपस्थित मान्यवरांच्या मनोगतांतून सामाजिक न्याय, समता आणि शिक्षण या त्रिसूत्रीचा प्रभावी संदेश या कार्यक्रम ाच्या माध्यमातून दिला गेला.

कार्यक्रमास जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त व्यक्ती ,शासकीय वसतिगृह व निवासी शाळेचे शालेय विद्यार्थी , शिक्षक मुख्याध्यापक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# नागपूर समृद्धी महामार्गावर अवघ्या २० दिवसांत खड्डे!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : समृद्धी महामार्गावरील इगतपुरी ते आमणे या शेवटच्या टप्प्याचे ५ जून रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले होते . या महामार्गावर इगतपुरी ते आमणे दरम्यानच्या महामार्गावरील शहापूर तालुक्याच्या हद्दीत अवघ्या २० दिवसात आमने ते इगतपुरी तसेच इगतपुरी ते आमने या दोन्ही मार्गिकेवर पडले खड्डे पडले आहेत.

इगतपुरी ते आमने हा समृद्धी महामार्गाचा शेवटचा ७६ किमीचा टप्पा आहे. या टप्प्याला ११८२ करोड रुपये खर्च केल्यानंतर अवघ्या २० दिवसांत पडलेले खड्डे बुजवण्याची नामुष्की रस्ते विकास प्राधिकरणांवर आली आहे. शहापूर तालुक्यात रस्ते भरण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

या महामार्गावर वाहनाचा वेग हा प्रतितास ८०,१०० ते १२० दरम्यान असतो, अपघातांना आमंत्रण देणारे खड्डे पडणे, त्यामुळे समृद्धी महामार्गावरील कामावर प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे.

# हरवले आहेत आपण यांना पाहिलत का ?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : शुभम रमेश सूर्यवंशी वय वर्ष १८ दिनांक २५/६/२०२५ या तारखेस घरातून न सांगता निघून गेला आहे. घरामधील सर्व माणसे चिंचेत आहेत.

ज र कृ प या कोणाला आढळून आल्यास त्वरित संपर्क साधावा.

मोबाईल नंबर ९४२१४४७७६९ / ९५२७२७६७५६ / ९७६४५१३४९७

पत्ता : सावरकर कॉलनी शेल्हाळ रोड तालुका उदगीर जिल्हा लातूर महाराष्ट्र.



# २५ जून १९७५ भारतीय लोकशाहीचा काळा दिवस!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २५ जून १९७५ रोजी लोकशाहीच्या गळ्याला हात घालण्यात आला आणि त्याविरुद्ध आवाज उठवून म्हणजे बंड ठरत होतं.

याविरुद्ध आपल्या पंढरपूर येथील अँड श्री प्रकाश कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष सहभागी झाले होते. आपला आवाज उठवला, त्यांनी लोकशाहीसाठी तुरुंगवास पत्करला, त्या गाणी तपश्चर्याने संघर्ष केला आहे. आज आम्ही त्यांच्या घरी जाऊन सत्कार केला. व यावेळी उपस्थितीत भाजपा तालुका अध्यक्ष श्री सुभाष मस्के सर, शहराध्यक्ष लाला पानकर, श्री डमडम राजू मिस्त्री, माजी नगरसेवक शैलेश बडवे उपस्थित होते.

लोकशाही म्हणजे फक्त शासन नव्हे, तर जनतेचा आ–वाज आणि हा आवाज कधी थांबवता येत नाही!

# केवळ सेवा देण्यामुळेच शिक्षकाला निवृती नंतर देखील समाधानी आयुष्य लाभते : माजी आ . दत्तात्रय सावंत




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग ,ता .२६: शिक्षण क्षेत्रात नवनविन अभ्यास पद्धती व प्रणाली येत आहेत ,त्या स्विकारून शिक्षकांना सामोरे जावे लागत आहे. शिक्षक हा आयुष्यभर विद्या दानरूपी सेवा देण्याचे काम करतो त्यामुळे त्याच्या सेवा निवृत्ती नंतरच्या आयुष्यात सुद्धा त्याला समाधानकारक लाभते . असे प्रतिपादन पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी व्यक्त केले.

वैराग (ता .बार्शी )येथिल विद्या मंदिर हायस्कूलमध्ये टेक्निकल विभागात शिक्षक म्हणून कार्यरत अंगद रंगनाथ कांबळे यांच्या सेवापूर्ती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते . त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष भूषण भूमकर हे उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या वतीने अंगद कांबळे यांचा सन्मान करण्यात आला . कांबळे यांनी आपल्या सेवापूर्ती व वाढदिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी संस्थेला वह्या भेट दिल्या . यावेळी अंगद कांबळे यांनी आपल्या मनोगतातून प्राथमिक शिक्षणा पासून ते सेवानिवृती पर्यतचा जडण – घडणीचा आलेख मांडला.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष – निरंजन भूमकर, चेअरमन – मृणाल भूमकर, सचिव – निनाद भूमकर, माजी उपसरपंच – संजय भूमकर, पिंपळनेर च्या ( ता .माढा ) सरपंच अनुजा डांगे, माजी जिल्हा परिषद सदस्य – संजय डांगे, पत्रकार सुहास कांबळे, नगरसेवक नागनाथ वाघ, वैजिनाथ आदमाने, पिंटु लांडगे, हरिश गाडेकर, मुख्याध्यापिका सुवर्णा वैदय, दादासाहेब कळसाईत, अशोक दाताळ, संस्कारधाम फाउंडेशनचे संस्थापक सत्तार तांबोळी उपस्थित होते. सुत्रसंचालन कालिदास जानराव यांनी केले .प्रास्ताविक – मुख्याध्यापक कल्याण करंडे यांनी केले.

# कुणबी युवा मंच,मुंबई ( रजि. ) तालुका – माणगाव संघटनेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान हा बोध घेऊन कुणबी युवा मंच, मुंबई (रजि.) तालुका माणगाव आणि कुणबी युवती महिला संघटना मुंबई तालुका – माणगाव आयोजित आणि लोकमान्य टिळक रुग्णालय,सायन रक्तपेढी यांच्या पुढाकारने सायन रुग्णालय, मुंबई येथे रविवार दि.२९ जून २०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० यावेळेत करण्यात आले आहे.

मुंबई आणि तसेच पूर्ण महाराष्ट्र मध्ये रक्ताची ची अप–ुरी उपलब्धता बघता कुणबी युवा मंच मुंबई तालुका माणगाव या सामाजिक संघटनेमार्फत भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले आहे.ग्रामीण भागातून जास्तीत जास्त रुग्ण हे लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन येथे येतात.

तसेच लोकमान्य टिळक रुग्णालय,सायनच्या आसप–ास कोकणातील महाराष्ट्र मधील चाकरमानी जनता मोठ्या प्रमाणात राहते. आणि उपचारासाठी लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन मध्ये उपचारासाठी जात असते.याचेच प्रमाण बघता याठिकाणी लोकमान्य टिळक रुग्णालय,सायन रक्तपेढी ची निवड करण्यात आली आहे. तरी सर्वांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे तसेच मित्रपरिवार नातेवाईक यांना सुद्धा रक्तदान करण्यास सांगावे. असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी कल्पेश चाचले – ९२२२०८०५५५/ संतोष उभारे – ८३५६०५४७८९ यांच्याशी संपर्क साधावा.

# लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह शंकरराव मोहिते पटील यांची ७० वी जयंती अकलूज येथे विविध उपक्रमांनी साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्यावतीने अकलूज येथे गोळीबार चौक येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. उद्घाटन डॉक्टर धवन सिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले या शिबिरात १८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी जनसेवक संघटनेची सतीश पालकर, सुधीर रास्ते अण्णासाहेब, अण्णासाहेब इनामदार, राजाभाऊ गुळवे, विठ्ठल इंगळे, बापू सगर , नवनाथ साठे, मयूर माने, ज्योती कुंभार, संजय गाडे ,राहुल शहाणे, पिंटू वैद्य अनिल सोनार रघुनाथ साठे ,आदिजन उपस्थित होते

जुने पोलीस स्टेशन येथे जनसेवा कामगार संघटना शाखेचे उद्घाटन डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी भारत हनुमती ,आप्पा अवघडे, गोविंद पवार, रोहिदास हनवते, बापू खंडागळे, किशोर साठी, दत्ता काळुंखे ,अनिल बनपट्टे, दीपक लोंढे आदी उपस्थित होते तसेच उपजिल्हा रुग्णालय येथे गरोदर महिलांना सुकोडा व डिकोडा वाटप करण्यात आला. तसेच सदुभाऊ चौक येथे धवल सिंह रिक्षा स्टॉप




यांच्या वतीने प्रतिमा पूजन व जिल्हा वाटप करण्यात आले. यावेळी तात्या गुळवे किशोर चव्हाण टाकळकर रणजीत सुचला दे चंद्रकांत कोळी शिवदत्त रामदास अतिश चंद्र पंडित अतिश काजी नागेश सोनवणे मच्छिंद्र पगारे गौरव बाबर महादेव जगताप मनोहर कोळी नाटेकर देविदास जाधव अभी भरती आदिजन उपस्थित होते.

## पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची मोठी कामगिरी

## जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलिस स्टेशनला दिली भेट

# ६४ दुचाकी आणि चार चाकी वाहने मूळ मालकाच्या ताब्यात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलिसांकडून ६४ वाहनांची मूळ मालकाच्या ताब्यात देऊन पोलीस स्टेशनला बऱ्याच दिवसापासून असलेली टू व्हीलर आणि फोर व्हीलर मूळ मालकाच्या नावावर देण्यात आल्याची कारवाई केली आहे.

पंढरपूर तालुका पोलीस पोलीस ठाणे येथील बऱ्याच वर्षापासून मुद्देमाल दुचाकी व चार चाकी वाहने मूळ मार्गाचा शोध घेऊन सर्व पोलीस स्टेशनच्या आवारातील असलेली दुचाकी व चार चाकी वाहनांची तात्काळ निर्गती करण्याबाबत माननीय पो–लीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी समक्ष पंढरपूर तालुका पो–लीस स्टेशनला भेट देऊन संपूर्ण पोलीस स्टेशनला पडून असलेली दुचाकी व चार चाकी वाहने त्यांच्या मूळ मालकाला त्यांच्या निर्गती करण्याबाबत आदेश देण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने तालुका पो–लीस व तालुका पोलीस स्टेशन अनेक वर्षापासून मिळून आ–लेली वाणी अपघात व बेवारस पुण्यातील जमा असलेली दुचाकी व चार चाकी वाह–ने मूळ मालकाचा शोध घेऊन पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे बोलावून गाडीची मालक्याका असलेली आरसी बुक इतर कागदपत्रांची पडताळणी करून ६४ माने अपघात व बेवारस व इतर गुन्ह्यातील असे वाहने असून त्या संबंधित मूळ मालकाला बोलवून त्यांच्याकडे बॉण्ड वरती सुपूर्तता नामा तयार करून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून त्याचप्रमाणे काही मालक कर्नाटकातून बोलून त्यांना सद–रची वाहने यांच्या ताब्यामध्ये देण्यात आलेली असून एकूण ४४ दुचाकी व वीस चार चाकी अशी एकूण ६४ वाहने मूळ माळखाना सुपूर्त नाम्यावर देण्यात आ–लेले असून एकूण ६४ वाहनाची निर्मिती करण्यात आलेली आहे सदरची कारवाई भाग पोलीस अधीक्षक साहेब अतुल कुलकर्णी साहेब माननीय अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर साहेब माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पीएसआय भारत भोसले साहेब , पीएसआय विक्रम वडणे एस आय विजय गायकवाड पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल वाडदेकर, सज्जन भोसले, श्रीमती मनेरी मॅडम, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, विजयकुमार आवटी महिला पोलीस हवा–लदार पोलीस कॉन्स्टेबल कदम महिला पोलीस कॉन्स्टेबल ननवरे यांच्या पथकाने कारवाई केली.

# स्वेरीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरी

## सोलापुरातील किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज् लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र गुमास्ते यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी सोलापुरातील किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज् लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र गुमास्ते यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी प्रथम वर्ष अभियांत्रीकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी आपल्या भाषणातून राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज् लिमिटेडचे व्यवस्थापकीय रवींद्र गुमास्ते म्हणाले की, 'सक्तीचे मोफत शिक्षण, आरक्षणाचे जनक, रयतेचे आयुष्य सुखकर करण्यासाठी शाहू महाराजांनी केलेले दिव्य कार्य, कोल्हापुर संस्थानात राधानगरी सारखे धरण बांधून सिंचनाची केलेली व्यवस्था, कला रसिक- कलाकार, कुस्तीगीर व खेळाडू यांना त्यांनी दिलेला राजाश्रय, उद्योगधंद्यांना केलेले सहाय्य, वसतिगृह आणि शिक्षणसंस्थांची उभारणी अशा अनेकविध कार्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची लोकराजा अशी ओळख निर्माण झाली. ब्रिटीश राजसत्तेचा अंमल असताना सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व सर्व समाजांच्या सामाजिक उन्नतीसाठी आपले जीवन वेचणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेत शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात शेतकरी व प्रजेच्या हितासाठी मोलाचे कार्य केले. त्यांच्या या योगदानामुळे प्रत्येक ठिकाणी सामाजिक जाणिवेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे नाव घेतले जाते. यावेळी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज शिवाजी महाराज मोरे, किर्लोस्करचे वरिष्ठ व्यवस्थापक ऋषिकेश कुलकर्णी, सौ. कमला गुमास्ते, पर्यावरण तज्ञ डॉ. सचिन पुणेकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण कक्षाचे उपविभागीय अधिकारी निखिल मोरे, सौ. सुवर्ण भांगुरकर, वृक्षप्रेमी ग्रुपचे अॅड. सुनील वाळूजकर, अनंत जाधव, अमित राठोड, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा.ए.ए.मोटे, सर्व विभागप्रमुख, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



# बार्टी संस्थेत राजर्षी शाहू महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : दिनांक २६ जून

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री श्री संजयजी शिरसाट, प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे, बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती बार्टी संस्थेच्या वतीने संपुर्ण राज्यात विविध कार्यक्रमादवारे साजरी करण्यात आली.

दिनांक २६ जून २०२५ रोजी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, वृषाली शिंदे, अनिल कारंडे, शुभांगी पाटील, योगिता झानपुरे यांनीही अभिवादन केले.

बार्टी मुख्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे (फोटो) प्रदर्शन भरविण्यात आले आहे. त्यांचे उद्धघाटन श्रीमती भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना त्यांनी महाराजांनी विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यता निवारण अशा अनेक पैलूंवर प्रकाश टाकला. तसेच राजर्षी शाहू महाराजांचा समतेचा वारसा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे नेल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांनी शाहू महाराजांनी



१९०२ मध्ये मागास समाजाला आरक्षण देऊन समता प्रस्थापित केली तसेच विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह आणि शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली असल्याचे सांगितले. शाहू महाराजांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनास नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन केले.

ईतिहास संशोधक डॉ. संभाजी बिरांजे यांनी छत्रपती शाहू महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महापुरुषांतील स्नेह कसा होता. माणगांव परिषद, मूकनायकला महाराजांनी केलेली आर्थिक मदत आणि युगपुरुष उभा राहावा म्हणून महाराजांनी विदेशात उच्च शिक्षणासाठी महामानव डॉ. बाबासाहेबांना आर्थिक मदत केली असल्याचे सांगून अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

शाहू महाराजांच्या दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनास बार्टीतील अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.

प्रकाशन व प्रसिद्धी विभागाच्या प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरिन तांबोळी व प्रकाशन व समतादुत विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सुत्रसंचलन श्री. रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले. छायाचित्रण श्री. राहुल कवडे यांनी केले..

# शाहू महाराज हे सामाजिक न्याय आणि समतेचे पुरस्कर्ते होते : डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप उपस्थित होते.



पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षण हेच खरे शस्त्र आहे आणि हे शस्त्र सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले पाहिजे असे शाहू महाराज म्हणत होते, त्यांनी सर्वसामान्य आणि मागासवर्गीय मुला मुलींसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले. मुलींची स्वतंत्र शाळा उघडल्या. त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी मदत केली, त्यांच्या विचारांना मान्यता दिली. शाहू महाराजांचा दृष्टिकोन धर्मनिरपेक्ष होता. त्यांनी अनेक आंतरजातीय विवाहांना मान्यता दिली. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, कर्जमाफी, शेती विषयक विकास योजना अशा विविध योजना त्यांनी राबवल्या. मजुरांसाठी कामगार कायदे, किमान वेतन, कामाचे तास निश्चित केले. महात्मा फुले यांच्या विचारांचे त्यानी समर्थन केलं, माणूस धर्म हा श्रेष्ठ धर्म ही त्यांची विचारधारा होती. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या जीवन चरित्र ग्रंथाचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ.कल्पना स्वामी यांनी केले तर उपस्थितांचे आभार निशिगंधा कोळी यांनी मानले.

# शाहु महाराज हे आरक्षणिय सामाजिक समतेचे पुरस्कार करणारे खरे लोकनेते : रविशंकर इठुले




**निवासी शाळेत सामाजिक न्याय दिवस साजरा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : समाजाच्या मागासवर्गीय समाजातील लहान घटक यांचा खरा उध्दार केले. त्यांनीच समाजातील घटकांचा खरा आरसा शिक्षण आहे. ते शिक्षण शाहू महाराजांनी सर्व घटकांना देण्याचे कार्य महत्त्वाचे केले आहे. अशा प्रकारचे खूप कार्य केले आहे. आरक्षण देऊन जीवनाचे उद्धार करच्यात आहे. म्हणून शाहू महाराजच खरे आरक्षणिय सामाजिक समतेचे पुरस्कार करणारे खरे लोकनेते. आहेत. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाला मुख्याध्यापक रविशंकर इठूले, प्रदीप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, आशिष शहारे, पी. एल. लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी व तुषार महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रसंगी शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. उपस्थित सर्वांनी शाहू महाराजांना अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुन्नाभाई नंदागवळी यांनी करून आभार आशिष शहारे यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्र ग्रंथांचा अभ्यास करावा : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राजर्षी शाहू महाराजांनी राजकीय,सामाजिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. अस्पृश्यांना सामाजिक न्याय मिळवून दिला म्हणून विद्यार्थ्यांनी त्यांच्या चरित्र ग्रंथांचा सखोल अभ्यास केला पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.




**कल्याणशेट्टी महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम**

पुढे बोलताना ते म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी समाज हितासाठी व्यापक कार्य केले. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी अस्पृश्य समाजासाठी त्यांनी दिलेले योगदान सर्वश्रुत आहे त्याचा वृत्तांत त्यांच्या चरित्र ग्रंथात अधोरेखित झाला आहे. म्हणून चरित्र ग्रंथांचा अभ्यास आवश्यक आहे.

प्राचार्य डॉ लोखंडे म्हणाले की, राजर्षी शाहू महाराजांनी वंचित उपेक्षित समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली, त्याची अंमलबजावणी सरकारी फर्मान काढले, महाराजांनी सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना प्रशासनात सामावून घेतले त्यामुळे प्रशासनात पारदर्शकता निर्माण झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा शितल फटाणे यांनी केले सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे भस्मे यांनी केले तर आभार प्रा मनीषा शिंदे यांनी मानले.

**ग्रंथालयाची दालने समृद्ध असावीत**

**राजर्षी शाहू महाराजांची ग्रंथ संपदा प्रत्येक वाचनालय तसेच महाविद्यालयातील ग्रंथ दालनात उपलब्ध झाली पाहिजे तरच विद्यार्थ्यांना पुरोगामी महाराष्ट्राचा झालेला विकास ज्ञात होईल असे यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले.**

## स्वेरीमध्ये 'किर्लोस्कर वसुंधरा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' चे थाटात उद्घाटन

## 'पंढरीची वारी', 'सुवर्ण पिंपळ' आणि 'बीज प्रसार' या पुस्तकाचे अनावरण

# समाजाच्या प्रगतीसाठी उत्तरदायित्वाची भावना आवश्यक : व्यवस्थापकीय संचालक रवींद्रनाथ गुमास्ते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'आज आपण प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत. ही प्रगती सहज होत नसते. त्यासाठी विविध समाज घटकांमध्ये आपण समाजासाठी काय देणं लागतो याची जाणीव महत्त्वाची असते. आज याच भावनेतून किर्लोस्कर कंपनीच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रयत्नांतील सातत्य या फार महत्त्वपूर्ण बाबी आहेत. आज इंजिनिअरिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचा विकास करून उत्तम करिअर घडवले पाहिजे.' असे प्रतिपादन किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज् लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्रनाथ गुमास्ते यांनी केले.

स्वेरीमध्ये सी.एस.आर. अंतर्गत 'किर्लोस्कर वसुंधरा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' चे थाटात उदघाटन करण्यात आले याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज् लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्रनाथ गुमास्ते हे मार्गदर्शन करत होते. ज्ञानेश्वर महाराज जोगदंड यांच्या संगीत शिक्षण संस्थेतील बाल वारकऱ्यांनी सादर केलेल्या भजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी मान्यवरांचे वारकरी पंचा, टोपी, गोपीचंदन व बुक्क्याचा टिळा लावून स्वागत केले. यावेळी प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे म्हणाले की, 'स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात किर्लोस्कर समूहाचे कार्य अतुलनीय आहे. शेतकऱ्यांसाठी नांगर बनवण्यापासून ते औद्योगिक उत्पादन करेपर्यंत आज १७ विविध प्रकारच्या प्लांट मधून निर्मिती केली जात आहे. त्यांचे उद्योग व सामाजिक योगदान अनमोल आहे.' अशा भाषेत डॉ.रोंगे यांनी किर्लोस्कर समूहाचा गौरव केला. यावेळी सोलापूर आणि सांगलीमध्ये २५ वर्षांपासून कार्य करत असलेल्या 'अस्तित्व' या संस्थेला संस्था विभागात 'किर्लोस्कर वसुंधरा पुरस्कारा'ने गौरवण्यात आले. यावेळी जितेंद्र गडहिरे यांनी महाराष्ट्रात विविध भागात काम सुरू असलेल्या 'अस्तित्व' संस्थेची वाटचाल सांगितली. यासाठी विविध व्यक्ती व संस्था मदत उपलब्ध करून देतात. ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे यांना त्यांच्या पर्यावरण संदर्भातील कार्यासाठी पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण कक्षाचे उपविभागीय अधिकारी निखिल मोरे म्हणाले की, 'पर्यावरण हा एक अत्यंत अवघड विषय असून पर्यावरण रक्षण हे धनुष्य उचलण्यासारखे आहे. ते एकट्या-दुकट्याचे काम नसून एक शिवधनुष्य आहे जे सर्वांनी उचलले पाहिजे. वारी काळात केलेली स्वच्छता, सेवेकरी आणि ग्राउंड ला काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांचा हा पुरस्कार आहे. असे म्हणून पुरस्काराचा सन्मान केला. यावेळी दत्तात्रय गायकवाड लिखित 'पंढरीची वारी' व पर्यावरण तज्ञ डॉ. सचिन पुणेकर लिखित 'सुवर्ण पिंपळ' व 'बीज प्रसार' या पुस्तकांचे अनावरण करण्यात आले.



जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह. भ. प. श्री शिवाजीराव मोरे यांनी निर्मलवारी व हरितवारी या दोन संकल्पना दोन वारकऱ्यांसाठी वारी कशी सुकर केली व यातून पर्यावरणासाठी पर्यावरण रक्षणासाठी कशी मदत झाली आणि या उपक्रमाकरिता लोक एकत्र कसे आले याबद्दल मनोगत व्यक्त केले. ऋषिकेश कुलकर्णी यांनी स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग श्री मोरे महाराज व पंढरपूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वारीपथावर शंभर देशी झाडांची लागवड केली व या उपक्रमास वसुंधरा उपक्रमास सुरुवात केली असे सांगितले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, सोलापूरचे वरिष्ठ व्यवस्थापक (एच. आर.) ऋषिकेश कुलकर्णी व त्यांच्या संपूर्ण टीमचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी कमला गुमास्ते, पर्यावरण तज्ञ डॉ. सचिन पुणेकर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण कक्षाचे उपविभागीय अधिकारी निखिल मोरे, सुवर्ण भांगुरकर, वृक्षप्रेमी ग्रुपचे ड. सुनील वाळूजकर, अनंत जाधव, अमित राठोड, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा. ए. ए. मोटे, सर्व विभागप्रमुख, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम वर्ष अभियांत्रीकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.